पुण्यनगरी पु. पा. नं ७

# तोडलेल्या बारचे पुन्हा बांधकाम

## रहिवाशांनी केली मिरा-भाईंदर महानगरपालिकेकडे तक्रार

**भाईंदर : पुढारी वृत्तसेवा**

मिरा-भाईंदर महापालिका हद्दीतील मिरागाव परिसरात असलेल्या अमर पॅलेस नामक बार कोव्हिड महामारीत सर्व उद्योग बंद असताना छुप्या पद्धतीने सुरू ठेवण्यात आला होता. त्याविरोधात काशिमीरा पोलिसांनी बारवर कारवाई करीत बार मालकासह, चालक, कर्मचारी व ग्राहकांवर गुन्हा दाखल केला होता.

पोलिसांनी पालिकेला दिलेल्या पत्रानुसार, पालिका आयुक्त दिलीप ढोले यांनी दिलेल्या शहरातील अनधिकृत बारवर कारवाई करण्याचे आदेश अतिक्रमण निर्मूलन विभागाला दिले. विभागाने या बारवर २०२१ मध्ये तोडक कारवाई करून बारचे अनधिकृत बांधकाम जमीनदोस्त केले होते. यानंतर बार चालकाने पालिकेला कोणतीही भनक लागू नये यासाठी बारभोवती पत्रे लावून पुन्हा अनधिकृत बांधकाम सुरु केल्याची तक्रार इमारतीतील सोसायटीने पालिका आयुक्तांकडे केली आहे. शहरात अगोदरच बारची संख्या मोठ्याप्रमाणात असताना त्यात दिवसागणिक भर पडत आहे. त्याचा त्रास इमारतीतील रहिवाशांसह तेथून ये-जा करणाऱ्या महिला व मुलींना होतो. शहरातील अनधिकृत बारवर कारवाई करण्याची मागणी आ. प्रताप सरनाईक यांनी देखील पालिकेकडे केली होती. मात्र ती काही काळापुरतीच मर्यादित राहिल्याने अनधिकृत बारला एकप्रकारे संरक्षणच मिळू लागल्याची चर्चा रहिवाशांमध्ये सुरु झाली आहे. पालिकेने तात्काळ अमर पॅलेस बारच्या अनधिकृत बांधकामावर कारवाई करून ते जमीनदोस्त करावे, अशी मागणी रहिवाशांनी केली आहे.



पान ५

# उत्तन, धावगी डोंगर क्लस्टरमुळे मासेमारी धोक्यात

**भाईंदर : पुढारी वृत्तसेवा**

राज्य शासनाने मिरा-भाईंदरमधील क्लस्टर योजनेची अधिसूचना पालिकेच्या माध्यमातून ५ मे रोजी जारी केली आहे. हि योजना उत्तनमधील चौक, पाली, करडई पाडा, धावगी डोंगर व भाटेबंदर परिसराला देखील लागू केली आहे. राज्य शासनाने पश्चिम किनारपट्टीवरील येथील नियोजित कोळीवाड्यांची हद्द निश्चित केलेली असताना लागू करण्यात आलेली क्लस्टर योजना स्थानिक मच्छीमारांच्या मासेमारी व्यवसायाला उध्वस्त करणारी ठरणार असल्याचा दावा करीत ही योजना तात्काळ रद्द करण्यात यावी, अशी मागणी अखिल महाराष्ट्र मच्छीमार कृती समितीचे कार्याध्यक्ष बर्नड डिमेलो यांनी पालिका आयुक्त दिलीप ढोले यांच्याकडे लेखी पत्राद्वारे केली आहे. योजना रद्द न केल्यास प्रचंड जनआंदोलन छेडण्याचा इशारा त्यांनी दिला आहे.

पालिकेने जारी केलेल्या क्लस्टर योजनेच्या अधिसुचनेत वरील परिसर मुंबई पोर्ट ट्रस्ट, महसूल विभागाच्या मालकीचे असल्याचे बर्नड यांनी निदर्शनास आणून दिले आहे. पालिकेने उत्तनमधील संबंधित कोळीवाड्यांवर लादलेले क्लस्टरचे अतिक्रमण येथील मच्छीमार समाजाला देशोधडीला लावणारे असल्याचा आरोप त्यांनी केला आहे. ठाण्याच्या धर्तीवर येथे राबविण्यात येणारी क्लस्टर योजना इथे राबविणे म्हणजे चुकीचा घेतलेला निर्णय असून ठाण्यात क्रियाशील मासेमारी होत नाही तर पश्चिम किनारपट्टीतील कोळीवाड्यांमध्ये मोठ्याप्रमाणात पिढीजात क्रियाशील मासेमारी होत असल्याचा दावा त्यांनी केला आहे. कोळीवाड्यातील घरांची नाळ मच्छीमारांच्या व्यवसायाशी घट्ट जोडलेली असून याठिकाणी क्लस्टर योजना राबविल्यास मच्छिमार समाज आपल्या पिढीजात व्यवसायापासून वंचित राहणार आहे. मासेमारी करण्यासाठी लागणारे साहित्य हे क्लस्टर मधील घरांमध्ये कसे ठेवायचे, साहित्य घरी ठेवल्यास मच्छीमार कुटुंबे राहणार कुठे. परिणामी ते मासेमारी व्यवसाय करणार कसा, अशा अनेक समस्या उद्भवणार आहेत. मच्छीमार समाज मागील दोन दशकांपासून आपल्या राहत्या घराखालच्या जमिनी मालकी हक्कावर करण्यासाठी राज्य शासनाकडे सतत पाठपुरावा करीत आहे. त्याला प्रत्येक सरकारने सकारात्मक प्रतिसाद दिलेला आहे.

Scanned with CamScanner

पुण्यनगरी पृ. ८

सकाळ पा. नं. ५

## अल्पवयीनाकडून लुटमारीचा प्रयत्न

भाईंदर, ता. ६ (बातमीदार) : सोळा वर्षीय मुलाने खोट्या पिस्तुलाच्या आधारे सोनाराला लुटण्याचा प्रयत्न केल्याची घटना शनिवारी (ता. ६) सायंकाळी भाईंदर पश्चिम येथे घडली. भाईंदर पश्चिम येथील साठ फुटी रस्त्यावर असलेल्या शक्ती ज्वेलर्स या दुकानात सायंकाळी पावणेपाचच्या सुमारास मास्क लावलेला एक सोळा वर्षीय मुलगा शिरला. आपल्याला सोन्याचे बिस्कीट विकायचे असल्याचे त्याने दुकानदारला सांगितले; मात्र दुकानदाराने त्याला नकर दिल्यानंतर मुलगा बाहेर गेला व लगेचच परत आला. या वेळी त्याने आपल्या बॅगेतून पिस्तुल काढले व दुकानदारावर रोखले. दुकानदाराने प्रसंगावधान दाखवत मुलाला दुकानाबाहेर खेचण्याचा प्रयत्न केला व बाहेर जाऊन आरडाओरड केला. ते पाहून रस्त्यावरील नागरिकांनी मुलाला पकडले व भाईंदर पोलिसांच्या ताब्यात दिले.

## वसई-विरार पालिकेची तोडक कारवाई

**विरार : पुढारी वृत्तसेवा**

पालिकेच्या अतिक्रमण विरोधी पथकाचे उपायुक्त डॉ. किशोर गवस यांनी पदभार स्वीकारल्यानंतर शुक्रवारी शासकीय सुट्टीच्या दिवशी जी प्रभागातील ४८ हजार २०० चौरस फुटांचे अनधिकृत बांधकामे जमीनदोस्त केले.

पालिका क्षेत्रात सातत्याने बेकायदा बांधकामे उभी राहतात. याविरोधात पालिकेच्या अतिक्रमण विरोधी पथकाने कारवाई सुरु ठेवली आहे. शुक्रवारी प्रभाग समिती जी मधील वापणे रेल्वे पुलाच्या बाजूला सर्व्हे नं. ३८, ३९, ४०, ४२, ४४ येथील १९ हजार चौरस फुटांचे १० इंडस्ट्रियल गाळे, याशिवाय ५ हजार ७०० चौरस फुटांचे १० खोल्या व ९ गाळे, तसेच ५५ पाया (प्लिंथ) २२५०० चौरस फूट असे एकूण ४८ हजार २०० चौरस फुटांचे अनधिकृत बांधकाम जमीनदोस्त करण्यात आले आहे. एकूणच या कारवाईमुळे चाळमाफियांचे धाबे चांगलेच दणाणले आहेत.

पुण्यनगरी पा. नं. १

**In Short**

## ८ बांगलादेशींवर पोलिसांची कारवाई

**मीरा रोड :** मीरा रोड परिसरात बेकायदा वास्तव्यास असलेल्या ८ बांगलादेशींवर अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्ष, भाईंदर पथकाने गुरुवारी कारवाई केली. मीरा रोड रेल्वे स्टेशनजवळील स्कायवॉक, अस्मिता व्हिन्टेज व शांती पार्क, सेक्टर-६, उमाकांत मिश्रा चौक या परिसरात बेकायदा वास्तव्यास असलेले बांगलादेशी कामासाठी येत असल्याची माहिती अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्ष, भाईंदर यांना मिळाली होती. त्याआधारे पोलीस निरीक्षक समीर अहिरराव यांनी पथकासह नवानगर पोलीस ठाणे हद्दीतील मीरा रोड रेल्वे स्टेशन स्कायवॉकजवळ, अस्मिता व्हिन्टेज व शांती पार्क, सेक्टर-६, उमाकांत मिश्रा चौक, नवानगर, मीरा रोड (पूर्व) या ठिकाणी सापळा रचून कारवाई केली. कारवाईत ६ महिला व दोन पुरुष अशा एकूण आठ बांगलादेशी नागरिकांना ताब्यात घेतले. त्यांची चौकशी केला असता, ते व्हीसा न बाळगता बेकायदा भारतात वास्तव्य करत असल्याचे निदर्शनास आले. त्यामुळे त्यांच्याविरुद्ध नवानगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

लोकमत पृ. पा. नं. १

## लॉजमध्ये वेश्याव्यवसाय

**लोकमत न्यूज नेटवर्क**

**मीरा रोड :** भाईंदरच्या उत्तन येथील महाराष्ट्र ज्युडिशियल अकादमीसमोरच लॉजमध्ये वेश्याव्यवसाय सुरू असल्याचे पोलिसांच्या धाडीत उघडकीस आले आहे. या प्रकरणी ७ जणांवर गुन्हा दाखल केला आहे.

उत्तन - गोराई मार्गावरील मॅक्सवेल लॉजमधील व्यवस्थापक, वेटर हे पुरुष ग्राहकांना वेश्यागमनासाठी तरुणींचे फोटो मोबाइलमध्ये दाखवून त्यांचा व रूमचा दर निश्चित करून पैसे घेतात आणि त्या बदल्यात तरुणी पुरवतात. तशी माहिती अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्षाला मिळाली. माहितीच्या आधारे पोलिसांनी छापा टाकून पीडित तरुणीची सुटका केली. मालक मार्शल डिसोजा, नेवील जेरोम डिसोजा, विजय कालेश्वर साव, वेटर रामलाल, मेघलाल बद्री महतो, अशोककुमार गोविंद सिंग, हेमलाल लिलो महतो यांना ताब्यात घेऊन उत्तन सागरी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.

Scanned with CamScanner

पुढारी पु.पा. ७

# मच्छीमारांच्या प्रश्नांकडे मत्स्यआयुक्तालयाचा कानाडोळा

## मच्छीमारांचे खासदार गावित यांना साकडे

नालासोपारा : पुढारी वृत्तसेवा

वसई बंदरातील विकास कामांकडे मत्स्य आयुक्तालय जाणून-बुजून दुर्लक्ष करत असून मच्छीमारांच्या समस्या गहन झाल्या असून त्याकडे लक्ष देण्याची मागणी खासदार राजेंद्र गावित यांना मच्छीमार संघटनांनी केली आहे. यावेळी परवाना अधिकारी डॉ.संदीप जाधव, उप अभियंता पत्तन विभाग श्री. बोबडे, विजय मेहेर, जितेंद्र मेहेर, व्हॅलेंटाईन मिरचो यांच्यासह अनेक मच्छीमार बांधव उपस्थित होते.



वसई पाचूबंदर येथील मच्छिमारांची बंदरातील विकास कामे करणेस मत्स्यव्यवसाय सहाय्यक आयूक्त पालघर यांच्याकडून चाललेला वेळकाढूपणा, चालढकलपणा व कामचुकारपणा व यासाठी सहाय्यक आयुक्त व कार्यकारी अभियंता, पतन यांत्रिकी विभाग कोकणभवन यांच्या सोबत तातडीची बैठक लावून मच्छीमारांचे प्रश्न सोडवण्यासाठी अनेक मच्छीमार सोसायटी अध्यक्षांनी खासदार राजेंद्र गावित यांची भेट घेतली.

वसई कोळीवाडा पाचूबंदर - लांगेबंदर येथील बंदरातील 'तीन जेटयांना जोडणारा मच्छिमारांकरीता चार चाकी वाहनांसाठी कॉंक्रीट रस्ता' व वसई पाचूबंदर येथील 'सावरोक गमज्या यांच्या घरासमोरील बंधाऱ्यापलिकडे जेट्टी' ही मच्छिमारांची दोन कामे करण्यासाठी आम्ही सहाय्यक आयुक्त मत्स्यव्यवसाय पालघर यांच्याकडे २०२० पासून पत्रव्यवहार करून पाठपुरावा करीत आहोत आणि सहाय्यक आयुक्त यांच्या कार्यालयात सारख्या हेलपाटया मारीत आहोत. मात्र या मच्छिमारांच्या दोन कामांवर सहाय्यक आयुक्त हे जाणूनबुजून दुर्लक्ष करीत आहेत. हि बाब अत्यंत गंभीर-आहे. वरील तिन जेटयांना जोडणारा चार चाकी वाहनांसाठी रस्ता नसल्यामुळे व सावरोक गमज्या यांच्या घरासमोरील ही जेटी नसल्यामुळे येथील मच्छिमारांचे अनेक वर्षापासून प्रचंड हाल होत आहेत.

पुढारी पा.नं. ५

# गेस्ट हाऊसवर कारवाई

मिरारोड : पुढारी वृत्तसेवा

भाईंदर पश्चिमेच्या मॅक्सवेल कम हॉलीडे होम, गेस्ट हाऊसवर अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्ष, भाईंदर पथकाने कारवाई करुन एका पीडित मुलीची सुटका करण्यात आली आहे.

भाईंदर पश्चिमेच्या उत्तन गोराई रोड येथील हॉटेल मॅक्सवेल कम हॉलीडे होम, गेस्ट हाऊसचा मॅनेजर व वेटर हे हॉटेल, गेस्ट हाऊसमध्ये येणाऱ्या पुरुष गिऱ्हाईकांनी वेश्यागमनासाठी मुलींची मागणी केल्यास वेटर हा प्रत्यक्ष त्याच्याकडे उपलब्ध असलेले त्याचे मोबाईल मधील मुलींचे फोटो दाखवुन गिऱ्हाईकाने पसंत केल्यानंतर वेश्यागमनाचा व रूम भाडे असा मोबदला घेवुन मुली पुरवत असल्याची माहिती अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष, भाईंदर यांना मिळाली होती.

मिळालेल्या माहिती नुसार अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष, भाईंदरचे पो. नि. समीर अहिरराव यांनी बोगस गिऱ्हाईक व पंच यांना हॉटेल मॅक्सवेल कम हॉलीडे होम, गेस्ट हाऊस या ठिकाणी पाठवून माहिती मिळवली. त्यानंतर पोलीस पथकासहर छापा टाकून कारवाई केली. या कारवाईमध्ये हॉटेल मॅक्सवेल कम हॉलीडे होम, गेस्ट हाऊसचा मॅनेजर विजय साव व वेटर रामलाल उर्फ कुबलाल महतो यांनी बोगस गिऱ्हाईकास त्यांच्या मोबाईलमधील मुलीचे फोटो दाखवून वेश्यागमनाचा मोबदला ठरवुन वेटर रामलाल उर्फ कुबलाल याने वेश्यागमनाचा मोबदला स्वीकारून बोगस गिऱ्हाईकास वेश्यागमनासाठी १ मुलगी पुरविल्याचे निष्पन्न झाले.

# मॅफेड्रॉन अमली पदार्थ विक्री; दोघांना अटक

## ८ लाख ४० हजारांचा मुद्देमाल जप्त



मिरारोड : पुढारी वृत्तसेवा

काशिमिरा पोलीस ठाणे हद्दीतील घोडबंदर येथे १०५ ग्रॅम वजनाचा मॅफेड्रॉन (एम.डी.) हा अंमली पदार्थ विक्री करण्यासाठी साठा करून ठेवलेल्या दोघांना परिमंडळ १, मिरारोड पथकाने कारवाई करून अटक केली आहे. त्यांच्याकडून ८,४०,००० रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे.

काशिमीरा पोलीस ठाणे हद्दीतील रेतीबंदर, घोडबंदर येथे एका चाळीमध्ये मोठ्या प्रमाणात मॅफेड्रॉन (एम.डी.) या अंमली पदार्थांची विक्री केली जात असल्याची माहिती जयंत बजबळे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ १ मिरारोड यांना शनिवारी माहिती मिळाली. मिळालेल्या माहितीच्या अनुषंगाने जयंत बजबळे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ १, मिरारोड यांनी त्या ठिकाणी पथकासह छापा टाकून कारवाई केली. त्यावेळी त्या ठिकाणी १०५ ग्रॅम वजनाचा ८,४०,००० रुपये किमतीचा मॅफेड्रॉन (एम.डी.) हा अंमली पदार्थ विक्री करण्यासाठी साठा केला असल्याचे निष्पन्न झाले. मुद्देमाल जप्त करण्यात आला असून त्याप्रकरणी आरोपी मरजहाँ ऊर्फ गुडीया ताजुद्दीन शेख व अली असगर हुसेन भाडेला, रा. रेतीबंदर, घोडबंदर यांच्याविरुद्ध काशिमीरा पोलीस ठाण्यात एन.डी.पी.एस. कायदा १९८५ चे कलम ८ (क), २१(क), २९ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

Scanned with CamScanner

म. टा. पा. नं. 1

# 'रिफायनरी गुजरातला न्या'

## महाडमधील सभेत उद्धव ठाकरे यांनी केंद्राला ठणकावले; बारसूतील स्थानिकांशी चर्चा

**म. टा. वृत्तसेवा, दापोली**

'वादग्रस्त प्रकल्प महाराष्ट्रात आणि इतर सगळे प्रकल्प गुजरातमध्ये हा कोणता न्याय? आम्हाला राख आणि तुम्हाला रांगोळी हे चालणार नाही', असे सांगत शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी शनिवारी महाडमधील जाहीर सभेत 'रिफायनरी प्रकल्प गुजरातला न्या', असे केंद्र सरकारला ठणकावले.

उद्धव ठाकरे यांनी शनिवारी बारसूमध्ये ग्रामस्थांची भेट घेऊन त्यांचे मत ऐकले. त्यानंतर पत्रकार परिषदेत केंद्र व राज्य सरकारवर रिफायनरीवरून हल्लाबोल केला. सायंकाळी महाडमधील सभेत उद्धव यांनी पुन्हा याच मुद्यावरून टीकास्त्र सोडले. 'या रिफायनरी प्रकल्पाची स्थानिकांना माहिती द्या. आपण आणखी काही उद्योग महाराष्ट्रात आणत होतो. बल्क ड्रग पार्क, वेदांत फॉक्सकॉन, एअरबससारखे प्रकल्प कुठे गेले? रिफायनरी प्रकल्प तुम्ही गुजरातला न्या आणि आमचे चांगले प्रकल्प इकडे आणा. आपल्या जनतेचे मुडदे पाडून हे सरकार त्याला विकास म्हणणार असेल, तर हा विकास मी होऊ देणार नाही', असे ठाकरे म्हणाले. 'आज मी जन की बात ऐकायला आलो आहे. मन की बात करायला नाही. मी राज्यकर्त्यांना आव्हान देतो, जसा मी पोलिसांशिवाय येथे येऊन उभा राहिलो आहे, तसे उभे राहा आणि रिफायनरीचे समर्थन करा', असेही ते म्हणाले.

'माझे पत्र दाखवले जात आहे. पण मला भीती नाही; कारण मी कोणतेही पाप केले नाही. नाणार होऊ देणार नाही, असा निर्णय मी मुख्यमंत्री म्हणून घेतला. रिफायनरीसाठी गद्दार माझ्याकडे येत होते. त्यांनीच माझ्याकडून पत्र घेतले. अंतिम मंजुरीबाबत मी स्वतः जाऊन सगळ्यांना विश्वासात घेऊन ठरवणार होतो', असे स्पष्टीकरणही त्यांनी दिले.

'तुम्ही प्रकल्पाची बाजू घेणारे जनतेसमोर का जात नाहीत? आता लोकांना तडीपार करीत आहात. पत्रकारांना अडवले जात आहे. मातीची चाचणी करता, मग मातीतल्या लोकांनाही विचारा. देश म्हणजे दगड-माती नाही. रिफायनरी आल्यास कोकणी माणसाला काय भांडवलदारांच्या दारात उभे करणार आहात? याचे उत्तर कुणाकडे नाही', अशी टीकाही उद्धव यांनी केली.




### 'मी तुमच्यासोबतच'

प्रस्तावित रिफायनरीच्या प्रकल्पाविरोधात आंदोलन छेडणाऱ्या भूमिपुत्रांशी थेट संवाद साधण्यासाठी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे शनिवारी बारसूमध्ये पोहोचले. 'तुमचा विरोध असेल तर रिफायनरी प्रकल्प येथे येता कामा नये, अशी माझी स्पष्ट भूमिका आहे. यासाठी मी तुमच्यासोबत आहे', असेही ठाकरे यांनी आश्वस्त केले.

➤ वृत्त...९

## 'कोकणवासीयांनो सावध राहा'

### राज ठाकरे यांची सूचना

**म. टा. वृत्तसेवा, दापोली/रत्नागिरी**

'कोकणी माणसांनो सावध राहा! परप्रांतीय जमिनी घेऊन तुम्हाला फसवत आहेत. विचार करा, कोकण वाचावा! हे सांगण्यासाठीच कोकणात आलो आहे. रत्नागिरीतील जाहीर सभा घेण्याचा हाच उद्देश असून, यापूर्वीच नाणार येथील प्रस्तावित रिफायनरी प्रकल्प नको, अशी भूमिका घेतली होती,' याची आठवण करून देत. भविष्यात बारसू येथेही ग्रीन रिफायनरी प्रकल्प होण्याची शक्यता नाही, असे सुतोवाच महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे प्रमुख राज ठाकरे यांनी शनिवारी येथे केले.

यावेळी कोकणवासीयांना 'लावरे तो व्हिडीओ'च्या माध्यमातून कातळशिल्पांच्या स्लाइड दाखवल्या. तसेच बारसूमध्ये कातळशिल्प असून, या कातळशिल्पांना युनेस्कोचा जागतिक



वारसास्थळाचा दर्जा देण्यात आला आहे, त्यामुळे या भागात विकासकामे होऊ शकत नाही, हे दाखवून देत या भागात रिफायनरी प्रकल्प होऊ शकत नसल्याचे राज यांनी स्पष्ट केले. तसेच राजकारणी तुम्हाला मूर्ख बनवत असल्याचे सांगून सावध राहण्याचा सल्लाही त्यांनी दिला. 'कोकणवासीयांना (पान १वर)

Scanned with CamScanner

लोकमत पा. नं. 5

# तक्रारीवर कारवाईसाठी पोलिसाकडून मुलीची मागणी

## ज्येष्ठ नागरिकाची तक्रार : अधिकाऱ्याची चौकशी करण्याचे आदेश

लोकमत न्यूज नेटवर्क

**मीरारोड :** मुलाच्या लग्नासाठी सदनिका विक्री करताना झालेल्या फसवणुकीची तक्रार करणाऱ्या ७३ वर्षीय वृद्ध नागरिकाकडून आधी पैसे, मिठाई घेतल्यानंतर मुलीची मागणी केल्याची तक्रार भाईंदर पोलिस ठाण्याच्या वरिष्ठ निरीक्षकाविरुद्ध करण्यात आल्याने खळबळ उडाली आहे. पोलिस आयुक्तांनी उपायुक्तांमार्फत चौकशी सुरू केली.

भाईंदर पूर्वेला राहणारे सोहनलाल जांगीड यांची एक सदनिका पश्चिमेस क्रॉस गार्डनजवळ आहे. मुलाचे लग्न व पैशांची गरज असल्याने ती सदनिका विक्री करण्याचा निर्णय त्यांनी घेतला. मात्र, व्यवहारात एक महिला इस्टेट एजंट व खरेदीदार महिला यांनी फसवणूक केल्याची तक्रार त्यांनी भाईंदर पोलिस ठाण्यात दिली होती.

भावना फाउंडेशनच्या भावना तिवाडी यांना घेऊन सोहनलाल हे कारवाईसाठी पोलिस निरीक्षक मुगुट पाटील यांना भेटले होते. पोलिसांकडे सोहनलाल सतत पाठपुरावा करत होते. तक्रारदाराने केलेल्या तक्रारीनुसार, कारवाई करण्यासाठी त्यांच्याकडून मिठाई मागण्यात आली. ती त्यांनी पोलिसांना दिली. त्यानंतर पाकिटात टाकून काही रक्कमसुद्धा पोलिसांना दिली. तरीदेखील पोलिस तक्रार अर्जावर कारवाई करत नसल्याने सोहनलाल हे विचारणा करत होते. त्यावर पोलिस निरीक्षक मुगुट पाटील यांनी "भावना तिवाडीसारखी मुलगी दे", अशी मागणी केली. या प्रकाराचा जाब विचारायला भावना यांच्यासह आत्मस्वाभिमान वेल्फेअर संस्थेच्या रेणू रॉय व अन्य तसेच सोहनलाल हे मुगुट पाटील यांच्या दालनात गेले. त्यांनी गोंधळ घालत अपशब्द, शिवीगाळ केल्याबद्दल सोहनलाल व संबंधितांविरुद्ध अदखलपात्र गुन्हा दाखल केला. पोलिस आयुक्त मधुकर पांडेय यांना भेटून भावना, रेणू आदींनी तक्रारी केल्या आहेत.

### उपायुक्तांमार्फत प्रकरणाची चौकशी

भावना यांच्या तक्रारीवर पोलिस आयुक्तांनी या प्रकरणाची चौकशी वसई परिमंडळाच्या पोलिस उपायुक्त पौर्णिमा चौगुले यांच्याकडे सोपवली आहे. त्यांनी चौकशी सुरू केली असून, भावना यांचा जवाब नोंदवून घेतला. उपायुक्त चौगुले पोलिस चौकशीचा अहवाल आयुक्तांना सादर करणार आहेत.

### आरोप खोटा असल्याचा दावा

इस्टेट एजंटने घेतलेले पैसे परत मिळवून देण्यासाठी ते व भावना यांनी आपणास सांगितले होते. परंतु, ते आपले काम नसल्याचे त्यांना सांगितले होते. मुलगी मगितल्याचा, पैसे दिल्याचा त्यांचा आरोप खोटा असून, कायदेशीर कारवाई करणार असल्याचे मुगुट पाटील यांनी सांगितले.

पुढारी पृ. पा. नं 5

# वसईत रासपाच्या माजी पदाधिकाऱ्यावर जीवघेणा हल्ला

नालासोपारा : पुढारी वृत्तसेवा

राष्ट्रीय समाज पार्टीचे माजी पदाधिकारी प्रदिपकुमार हरिश्चंद्र पाल यांच्यावर जीवघेणा हल्ला करण्यात आला. या प्रकरणी वालीव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

प्रदीप कुमार पाल यांचा लहान भाऊ संदिप यान त्याची पत्नी लक्ष्मी हिचेसोबत दोन-तीन दिवसांपूर्वी घरगुती कारणावरून वाद झाला होता. त्यावरून लक्ष्मी हिचा भाऊ शिवकुमार त्याने संदीप यास शिवीगाळी व दमदाटी केली होती. पाल यांच्या चाळीमध्ये जोरजोरात ओरडण्याचा आवाज येत होता म्हणून बाहेर येऊन पाहिले असता लक्ष्मीचा भाऊ राजकुमार, शिवकुमार, काका-राजेशपाल व एक अनोळखी इसम हे संदीप याचे नावाने शिवीगाळी करीत होते. पाल यांना रुमसमोर दिसताच राजकुमार याने संदीप कुठे आहे असे विचारले असता त्यास संदीप कामानिमीत्त बाहेर गेला आहे असे सांगितले. त्यानंतर राजकुमार याने अश्लील शिवीगाळ केली, त्यास शिवीगाळी करु नका असे बोलत असताना राजेशपाल व त्यांचे सोबत असलेला एक अनोळखी इसम यांनी प्रदीप याला ठोशाबुक्याने मारहाण केली. तसेच राजकुमार व शिवकुमार याने लाकडी दांडक्याने माझे डोकीत, हातावर व पाठीवर उपटी मारुन दुखापत केली. तसेच शेजारी राहणारा जयप्रकाश पाल हा भांडण सोडविण्यासाठी आला असता त्यांनी जयप्रकाश यास देखिल लाकडी दांडक्याने मारहाण केली. त्यांच्या डोकीतून रक्त येत असल्याचे पाहुन राजकुमार, शिवकुमार, राजेशपाल व एक अनोळखी इसम संदिप याची पत्नी लक्ष्मी व दोन मुली यांनी त्यांचे सोबत घेवुन निघुण गेले. प्रदीप कुमार पाल यांनी दिलेला तक्रारीवरून वालीव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.

Scanned with CamScanner

# मीरा रोड मधून येथून 8 बांगला देशी नागरीकांना अटक

**प्रतिनिधी**

■ **मीरारोड**

मीरारोड येथे अनधिकृतरित्या वास्तव्यास असलेल्या ८ बांगलादेशी नागरीकांना भाईंदरच्या अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष पोलीसांनी अटक केली आहे.

मीरा रोड रेल्वे स्टेशन परिसर तसेच शांती पार्क भागात बांगला देशी नागरीक अनधिकृतरित्या वास्तव्य करत असल्याची माहिती अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष यांना मिळाली होती.

त्या अनुषंगाने पोलिस उपायुक्त अविनाश अंबुरे, सहायक पोलीस आयुक्त अमोल मांडवे यांचे मार्गदर्शनाखाली पो. नि. समीर अहिरराव, उमेश पाटील, विजय निलंगे, रामचंद्र पाटील, केशव शिंदे, अश्विनी भिलारे, सम्राट गावडे, शुभांगी मोकल यांनी सापळा रचून रेल्वे स्टेशनजवळील स्कायवॉक ब्रिज, अस्मीता व्हिन्टेज व शांतीपार्क, सेक्टर-६, उमाकांत मिश्रा चौक या परिसरात अनाधिकृतरित्या वास्तव्यास असलेल्या ६ महिला आणि २ पुरुष अशा ८ बांगलादेशी नागरिकांना ताब्यात घेतले. त्यांची चौकशी केली असता ते पारपत्र व व्हीजा न बाळगता अनाधिकृतपणे भारतात आल्याचे व वास्तव्य करीत असल्याचे आढळून आले. पोलीसांनी भारतीय पासपोर्ट अधिनियम कलम ३ (अ), ६ (अ) सह विदेशी व्यक्ती अधिनियम १९४६ चे कलम १४ (अ) प्रमाणे त्यांच्यावर गुन्हा दाखल केला आहे.


**जाहीर नोटीस**

सदर जाहीर नोटीसीव्दारे तमाम जनतेस कळविण्यात येते की, श्री. किरण मनमोहन लोकर आणि श्रीम. जयलक्ष्मी किरण लोलेकर हे सदनिका ए-१ / ७०४, एमजीन गार्डन एनक्लेव बिल्डींग नं. १ कॉ. ऑप. हौ.सो.लि., पोखरण रोड नं. २, बसंत विहार, ठाणे. ४००६१०. संयुक्त मालक होते, तरी त्यापैकी श्री. किरण मनमोहन लोलेकर यांचे दिनांक २२/०१/२०२० रोजी निधन झाले आहे, त्यांनी नामनिर्देशन केलेले नव्हते आणि आता श्री. किरण मनमोहन लोलेकर यांच्या पश्चात १) श्रीम. जयलक्ष्मी किरण लोलेकर (पत्नी), २) मनाली किरण लोलेकर (मुलगी) ३) सिध्दी किरण लोलेकर (मुलगी) हे त्यांचे वारस आहेत. श्रीम. जयलक्ष्मी किरण लोलेकर (पत्नी) यांना सदर मिळकतीकरीता १०० टक्के सभासद बनविण्याकामी अन्य वारसदार म्हणजेच १) मनाली किरण लोलेकर (मुलगी) २) सिध्दी किरण लोकर (मुलगी) यांची कोणत्याही प्रकारची हरकत नसुन, त्यांच्याद्वारे दि. २८ एप्रिल २०२३ रोजी हक्कसोडपत्र ही बनविण्यात आले आहे, ज् हे, ज्याचा दस्त क. ठाणे १२-६२१९/२०२३ असा आहे.

तरी या नोटीशीव्दारे संस्थेच्या भांडवलात मालमत्तेत असलेले मयत सभासदाचे भाग व हितसंबंध हस्तांतरीत केल्यासंबंधी मयत सभासदाचे अन्य वारसदार किंवा मागणीदार हरकतदार यांच्याकडुन हक्क मागण्या हरकती मागवण्यात येत आहेत


Scanned with CamScanner

# मीरा रोडमध्ये अंमली पदार्थांची विक्री

## दोघांना अटक

■ भाईंदर, प्रतिनिधी

मीरा रोडच्या रेतीबंदर भागातील एका चाळीतून मॅफेड्रॉन (एम.डी.) या अंमली पदार्थाचा ८ लाख ४० हजार रुपये किंमतीचा साठा पोलीसांनी जप्त करुन दोन जणाना अटक केली आहे. मीरा रोडच्या घोडबंदर गावातील रेतीबंदर येथिल एका चाळीत मोठ्या प्रमाणात मॅफेड्रॉन (एम.डी.) या अंमली पदार्थाची विक्री केली जाते अशी माहिती पोलीस उप आयुक्त, परिमंडळ १ ला मिळाली होती, त्यानुसार पोलिस आयुक्त मधुकर पाण्डेय, अपर पोलीस आयुक्त श्रीकांत पाठक यांचे मार्गदर्शनाखाली पोलिस उपायुक्त जयंत बजबळे, यांच्या मार्गदर्शनाखाली स.पो.नि. दत्तुसाहेब लोंढे,अजय मांडोळे, संतोष क्षिरसागर, विनोद चव्हाण, योगेश पाटील, बबन हरणे,भाग्यश्री माने यांनी सदर ठिकाणी छापा टाकून १०५ ग्रॅम वजनाचा व ८ लाख ४० हजार रुपये किंमतीचा मॅफेड्रॉन (एम.डी.) हा विक्री करता आणलेला अंमली पदार्थ जप्त करून मरजहॉ ऊर्फ गुडीया ताजुद्दीन शेख, अली असगर हुसेन भाडेला या दोघांना एन. डी. पी. एस. कायदा १९८५ चे कलम ८ (क), २१ (क), २९ अन्वये अटक केली आहे.

Scanned with CamScanner

# नकली पिस्तुलाचा धाक दाखवून ज्वेलर्सला लुटण्याचा प्रयत्न

## १५ वर्षीय मुलाला अटक

## शेअर मार्केटमध्ये करायची होती गुंतवणूक

■ **भाईंदर, प्रतिनिधी**

नववी इयत्तेची परिक्षा दिलेल्या अवघ्या १५ वर्षीय मुलाने भाईंदर येथिल एका ज्वेलर्स च्या दुकानात घुसून नकली पिस्तुलाचा धाक दाखवत लुटण्याचा प्रयत्न केला, दुकान मालक, त्याचा भाऊ आणि लोकांच्या मदतीने त्याला पकडुन भाईंदर पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले. पोलिसांच्या चौकशीत त्याला शेअर मार्केट मध्ये १० लाख रुपयांची गुंतवणूक करायची होती म्हणून त्याने गुन्हा केल्याचे उघडकीस आले आहे. भाईंदर पूर्व भागात राहणारा आणि नववी इयत्तेची परिक्षा दिलेल्या अवघ्या १५ वर्षीय



अल्पवयीन मुलाने भाईंदर पश्चिम भागातील इंदिरा कॉम्प्लेक्स येथिल शक्ति ज्वेलर्स या दुकानात जाऊन सोन्याचे बिस्कीट गहाण ठेवणार का अशी विचारणा केली. दुकानाचे मालक अशोक जैन यांनी त्याला नकार दिला. त्या नंतर तो बराच वेळ दुकाना बाहेर उभा होता, त्यामुळे जैन यांनी त्याला पिटाळून लावले. काही वेळाने तो परत आला आणि आपल्या जवळील पिस्तुलाचा धाक दाखवून लुटण्याचा प्रयत्न करत असताना अशोक जैन आणि त्यांच्या भावाने हिंमत दाखवून त्याला पकडले, गोंधळ आणि आवाज ऐकून दुकाना बाहेर जमलेल्या लोकांनी त्याला पकडले आणि भाईंदर पोलिसांच्या ताब्यात दिले. दरम्यान त्याने फेकून दिलेले पिस्तूल नकली होते. भाईंदर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक मुगुटराव पाटील यांनी दिलेल्या माहितीनुसार त्या मुलाला देशाच्या आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर शेअर मार्केटचे चांगले ज्ञान असून त्याला शेअर मार्केट मध्ये १० लाख रुपयांची गुंतवणूक करायची होती त्यामुळे त्याने हे कृत्य केल्याची कबुली दिली आहे.

Scanned with CamScanner

महानगर संस्करण
मुंबई, 7 मई 2023
9 राज्य 18 संस्करण
दैनिक दबंग दुनिया
Sunday
निष्पक्ष नज़र, निष्पक्ष ख़बर
www.dabangdunia.co.in
मूल्य ₹ 5.00
वर्ष-9, अंक 284, पृष्ठ- 10
देश का सबसे चर्चित संपूर्ण हिंदी अख़बार



08 अब गन्ना की एफआरपी बढ़ने...

# हथियार के साथ दो गिरफ्तार



**दबंग रिपोर्टर » वसई**

पेल्हार पुलिस स्टेशन की क्राइम डिटेक्शन सेल की टीम ने 2 लोगो को एक पिस्टल व एक जिंदा कारतूस के साथ गिरफ्तार किया है। यह कार्रवाई परिमंडल 3 डीसीपी सुहास बावचे व एसीपी रामचंद्र देशमुख के मार्गदर्शन में पेल्हार पुलिस स्टेशन के सीनियर पीआई वसंत लब्दे के नेतृत्व में पीएसआई सनिल पाटील की टीम ने की है। पुलिस अधिकारी ने बताया कि क्राइम डिटेक्शन को 4 मई को गुप्त सूचना मिली कि आर्म स्टॉग इंडीया कन्ट्रक्शन आरएमसी प्लॅन्ट कंपनी के सामने, रिचर्ड कंपाऊन्ड, मनिचापाडा, पेल्हार, नालासोपारा पूर्व इस स्थान पर दो शख्स बिना लाइसेंस और अवैध अग्निशस्त्र लेकर आने वाले है।जिसके बाद सूचना के आधार पर क्राइम डिटेक्शन सेल की टीम ने उक्त स्थान पर जाल बिछाया और आरोपी 1).मोईन अन्वर शेख व 2). शकील अहमद इसरार खान को हिरासत में लिया,पुलिस ने आरोपियों की तलाशी ली तो इनके पास से 1 स्वचालित (ऑटोमैटिक पिस्टल ) व 1 जिंदा कारतूस कुलमिलाकर 25,200 रुपये का माल पाया,पुलिस ने उक्त हथियार को बरामद कर दोनो को गिरफ्तार किया है।पुलिस ने कहा कि दोनो आरोपियों के ऊपर आर्म एक्ट के तहत केस दर्ज किया है।आगे की तहकीकात कर रही है।

Scanned with CamScanner

लोकमत

## मशालयात्रेसह विविध कार्यक्रमांची रेलचेल : आज होणार सांगता

# वसईकरांच्या सहभागाने २८५ व्या विजयोत्सवाची जल्लोषात सुरुवात

लोकमत न्यूज नेटवर्क

नालासोपारा : हिंदवी स्वराज्याचे पेशवे श्रीमंत बाजीराव यांचे धाकटे बंधू नरवीर चिमाजी आप्पांच्या नेतृत्वाखाली स्वराज्याच्या शूरवीरांनी आपल्या जिवाचे रान करत फिरंगी पोर्तुगीज सत्तेचे उत्तर कोकणातून समूळ उच्चाटन केले. पोर्तुगीजांच्या अराजकतेतून वसईकर रयतेला मुक्त व सुखी करण्यासाठी स्वराज्याच्या २२ हजार शूरवीरांनी आपल्या प्राणांची आहुती दिली. अशा या वसईचा २८५ वा विजयोत्सव चिमाजी आप्पांच्या पुतळ्याला अभिवादनासह विजयी मशाल घेऊन निघालेली रॅली, विविध मर्दानी खेळांची प्रात्यक्षिके, सांस्कृतिक कार्यक्रम अशा विविध उपक्रमांनी साजरा होत आहे. विजयोत्सवाची सुरुवात शुक्रवारी झाली असून आज, रविवार, ७ मेपर्यंत विविध कार्यक्रम होणार आहेत.

वसई जिंकण्यासाठी नरवीर चिमाजी आप्पांनी वज्रेश्वरी देवीकडे नवस केला होता. देवीच्या कृपेने वसईवर स्वराज्याचा भगवा फडकला व वसई पुन्हा सुखी-आनंदी झाली. अशा या ऐतिहासिक विजयानिमित्त वेदमूर्ती धनंजय शास्त्री वैद्य यांच्या मार्गदर्शनाखाली सालाबादप्रमाणे वसई विरार शहर महानगरपालिका व राज्य सरकारच्या महाराष्ट्र पर्यटन विभागातर्फे वसई विजयोत्सवाचे आयोजन करण्यात येते. दरवर्षी वज्रेश्वरी ते वसई किल्ला 'भव्य मशालयात्रेचे' आयोजन करण्यात येते. या वर्षी वैशाख शु. पौर्णिमा म्हणजेच ५ मेला निघालेल्या मशालयात्रेत अनेक दुचाकी व चारचाकीस्वारांनी सहभाग घेतला. वज्रेश्वरी मंदिरात धर्मसभा सचिव पं. हृषिकेश वैद्य व माजी महापौर राजीव पाटील यांच्या हस्ते आरती करून मशालयात्रेची सुरुवात झाली. माजी खासदार बळिराम जाधव, आमदार राजेश पाटील, नरवीर चिमाजी आप्पांच्या व मावळ्यांच्या वेशातील वसईकर यात्रेच्या अग्रस्थानी होते. नरवीर चिमाजी आप्पांच्या व मावळ्यांच्या पोषाखातील 'आमची वसई' व वसई ॲडव्हेंचर ग्रुपच्या सदस्यांनी मशाल मिरवत पुढे नेली. पारनाका ते वसई किल्ला भव्य शोभायात्रेचे आयोजन करण्यात आले.









वसई विजयोत्सवाचे शुक्रवारी उद्घाटन झाले. पहिल्या छायाचित्रात नरवीर चिमाजी आप्पा यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करताना आमदार हितेंद्र ठाकूर, दुसऱ्या छायाचित्रात शस्त्रास्त्रांचे प्रदर्शन पाहताना खा. राजेंद्र गावित, आयुक्त अनिलकुमार पवार व इतर. तिसऱ्या छायाचित्रात मशालयात्रा तर चौथ्या छायाचित्रात किल्ल्याची प्रतिकृती पाहायला मिळत आहे.

## विविध स्पर्धांच्या आयोजनासह खाद्यपदार्थांचे स्टॉल

सायंकाळी साडेसहा वाजता वसई किल्ल्यातील नरवीर चिमाजी आप्पा स्मारकात वसईचे आ. हितेंद्र ठाकूर यांच्या हस्ते श्रीमंत नरवीर चिमाजी आप्पांच्या अश्वारूढ पुतळ्यास पुष्पहार अर्पण करण्यात आले. किल्ले बांधणी स्पर्धा, रांगोळी स्पर्धा, वेशभूषा स्पर्धा, वसईतील विविध जाती धर्मांचे खाद्य स्टॉल, शस्त्रास्त्र प्रदर्शन इ.चे उद्घाटन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

याप्रसंगी खासदार राजेंद्र गावित, मनपा आयुक्त अनिलकुमार पवार, पोलिस सहआयुक्त पद्मजा बढे, इतिहास अभ्यासक श्रीदत्त राऊत, माजी जिल्हा परिषद अध्यक्ष पांडुरंग नाईक, माजी महापौर नारायण मानकर, प्रवीण शेट्टी, अनेक माजी नगरसेवक, वसई-विरारचे सर्वधर्मीय नागरिक उपस्थित होते.



Scanned with CamScanner